वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट मांजरी (बु.) ता. हवेली जिल्हा पुणे या संस्थेस साखर संशोधनासाठी सहाय्यक अनुदान मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः ससाका-२०१९/प्र.क्र.३४/२५स,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: १६.३.२०१९

वाचा -

१) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.ससाका- १००९/१३७१/ प्र.क्र. १२ / २५स, दिनांक १७/६/२००९.

२) शासन निर्णय,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,क्र ससाका- १००९/प्र.क्र.१२६/ २५-स, दिनांक १८/८/२००९.

३) शासन परिपत्रक,वित्त विभाग,क्र अर्थसं - २०१८ / प्र.क्र. ६९/अर्थ-३,दि. २५.१.२०१९

४) शासन निर्णय सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.ससाका २०१८/प्र.क्र.१४०/२५ स, दि.२४.९.२०१८

५) शासन निर्णय,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,क्र ससाका- २०१९/प्र.क्र.३४/ २५-स, दिनांक ५.२.२०१९ .

६) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र. /साआ / अर्थ ३/ कक्ष-६/ व्हीएसआय/ उर्वरीत अनु. १९ /४४०८ , दिनांक १४.२.२०१९

७) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र. संकीर्ण - २०१९ / प्र.क्र. ३३ / कोषा प्रशा-५ /दि. ७.३.२०१९

शासन निर्णय-

साखर संशोधनासाठी सहायक अनुदान यासाठी सन २०१८-१९ मध्ये उपलब्ध असलेल्या रु. ५,००,००,०००/- (रुपये पाच कोटी फक्त) तरतुदीपैकी ९० % म्हणजेच रु.४,५०,००,०००/- (रुपये चार कोटी पन्नास लाख फक्त) वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, मांजरी (बु.), ता. हवेली, जिल्हा- पुणे या संस्थेस अदा करण्यास शासन निर्णय दि.२४.०९.२०१८ व दि. ५.२.२०१९ अन्वये मंजूरी दिली आहे. आता वित्त विभागाच्या दि. ७.३.२०१९ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार सन २०१८-१९ साठी सुधारित अर्थसंकल्पित मंजूर निधीतील उर्वरित १० % तरतूद रु. ५०,००,०००/- (रुपये पन्नास लाख फक्त) वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, मांजरी (बु.), ता. हवेली, जिल्हा- पुणे या संस्थेस अदा करण्यास शासन याद्वारे मंजूरी देत आहे. सदरहू निधीचा वापर करताना शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक ससाका- १००९/प्र.क्र. २६/२५ स, दिनांक १८ ऑगस्ट, २००९ अन्वये विहित करण्यात आलेल्या नियम व अटीचे पालन करणे बंधनकारक आहे. तसेच सदर रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र संस्थेने सदर अनुदानाचा संपूर्ण विनियोग केल्यानंतर सनदी लेखा परिक्षकाकडून प्रमाणित करुन हे वित्तीय वर्ष संपल्यानंतर परंतु, पुढील वर्षाच्या वितरणापूर्वी सादर करावे.

२. रु. ५०,००,०००/- (रुपये पन्नास लाख फक्त)इतकी रक्कम " मागणी क्रमांक-व्ही-२, मुख्यलेखाशीर्ष-२४२५-सहकार,१०८ इतर सहकारी संस्थांना सहाय्य-(०३) सहकारी साखर कारखाने-, (०३)(०६) साखर संशोधनासाठी सहायक अनुदान (२४२५ १०४५), ३१, सहायक अनुदान " या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा. सदर खर्च सन २०१८-१९ साठी मंजूर झालेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. प्रस्तुत प्रकरणी लेखाधिकारी, साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी व संचालक (प्रशासन), साखर आयुक्तालय, साखर संकुल, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यानुसार लेखाधिकारी, साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, मांजरी बु., ता. हवेली, जिल्हा - पुणे (VASANTDADA SUGAR INSTITUTE, MANJARI (BK.) TALUKA - HAVELI, DISTRICT-PUNE) या संस्थेस अनुदान म्हणून मंजूर केलेली रक्कम रु. ५०,००,०००/- (रुपये पन्नास लाख फक्त)जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे यांचे कार्यालयामार्फत त्या संस्थेला वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

४. प्रमाणित करण्यात येते कि, या प्रकरणी शासन परिपत्रक,वित्त विभाग,क्र संकीर्ण - २०१९ / प्र.क्र. ३३ / कोषा प्रशा-५ , दि. ७.३.२०१९ मधील संबंधीत अटींची पूर्तता झाली आहे. साखर आयुक्त, पुणे यांनी सदर तरतूद वितरीत करताना तसेच खर्च करताना महाराष्ट्र अर्थ संकल्प नियमपुस्तिका व वित्तीय अधिकार नियमपुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच वित्त विभागाच्या दि. २०.४.२०१८ च्या परिपत्रकातील अटी व शर्तीचे व वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

५. सदरहू शासन निर्णय हा ,वित्त विभाग , अनौचारिक संदर्भ क्र.१६२/२०१९ / व्यय - २ , दि. ७.३.२०१९ अन्वये मिळालेल्या अभिप्रायानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१९०३१६१७१८०६७३०२** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pramod Mankoji Valanj

Digitally signed by Pramod Mankoji Valanj
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation, Marketing and Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e9e7fafe78ccbad1148295b75b2b4a0fc30e01ea267cb61e5d741e2bf211f323, cn=Pramod Mankoji Valanj
Date: 2019.03.16 17:51:14 +05'30'

(प्रमोद वळंज)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे (३ प्रती)
२) प्रधान महालेखापरिक्षक, लेखा परिक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई.
४) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
५) महालेखापाल -१, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा) मुंबई.
६) महालेखापाल -२, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा) नागपूर.
७) संचालक (प्रशासन), साखर आयुक्तालय, साखर संकुल, पुणे.
८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
९) लेखाधिकारी, साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे (३प्रती)
१०) सर्व प्रादेशिक सहसंचालक (साखर)
११) वित्त विभाग (व्यय-२), कराधान-३ व अर्थसंकल्प-१२, (अर्थोपाय शाखा)

१२) महासंचालक, वसंतदादा शुगर इन्स्टिटट्युट, मांजरी (बु.),ता. हवेली, जिल्हा - पुणे.

१३) अवर सचिव , १७-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

१४) सह संचालक, लेखा व कोषागारे,नवीन प्रशासकीय इमारत,मंत्रालय, मुंबई.

१५) कक्ष अधिकारी, १६-स तथा वेब को-ऑर्डिनेटर,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई.

१६) निवड नस्ती (२५-स.)